# शेतकऱ्यांना मान्सूनपूर्वी मशागत करून जून महिन्यात पेरणीसाठी शेत तयार करून ठेवावे लागते, पण यंदा मे महिन्यातच पावसाने धरला जोर...!

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564



■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २४६ ■ रविवार दि.२५ मे २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रु. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 246 ■ Sunday Dt.25 May 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

### प्रशासनाने कसल्याही आदेशाची वाट न पाहता नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचे तात्काळ पंचनामे करून नुकसानीचा अहवाल सादर करावा!

# बीड जिल्ह्यात १३२ हेक्टरवरील पिकांचे नुकसान, नुकसानीचे पंचनामे करा : जिल्हाधिकारी जॉन्सन

## जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे फळबागा आणि इतर पिकांचे मोठे नुकसान; शेतकरी मोठ्या संकटात

■ अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्याने काही ठिकाणी वीज पडल्याच्या घटनाही घडल्या, ज्यामुळे जीवितहानी आणि मालमत्तेचे नुकसान

■ शेतकरी आपल्या पिकांचे नुकसान भरुन काढण्यासाठी मदत आणि मदतीची मागणी करत आहे

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे नुकसान होत आहे. गेवराई, पाटोदा, आष्टी, माजलगाव, परळी, अंबाजोगाई आणि केज या तालुक्यांमध्ये जोरदार पाऊस आणि काही ठिकाणी गारपीट झाली आहे, ज्यामुळे काढणीला आलेली पिकांचे नुकसान झाली आहेत. अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्याने मोठे नुकसान झाले असून, ज्यामुळे शेतकरी आणि स्थानिक नागरिक त्रस्त आहेत. हवामान विभागाने आगामी काळातही अवकाळी पावसाची शक्यता वर्तवल्यामुळे, लोकांना अधिक सावध राहण्याची गरज आहे. जिल्ह्यात मान्सूनपूर्व शेतीची मशागत सुरू असतानाच पावसाने जोर धरला असल्याने उन्हाळी पिकांसह बागायत, फळफिकांचे मोठे नुकसान झाले आहे. यात १३२ हेक्टरवर पिकांचे नुकसान झाले असून आष्टी तालुक्यात ९८ शेतकऱ्यांची ३७.२४ हेक्टर जमीन खरडून गेली आहे. या पार्श्वभूमीवर नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

शेतकऱ्यांना मान्सूनपूर्वी मशागत करून जून महिन्यात पेरणीसाठी शेत तयार करून ठेवावे लागते. पण, यंदा मे महिन्यातच पावसाने जोर धरल्याने सर्वच कामे ठप्प आहेत. जिल्ह्यात काही ठिकाणी उन्हाळी पिके, फळबागा आहेत. वादळी वाऱ्यासह पाऊस पडत असल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. यामुळे प्रशासनाने कसल्याही आदेशाची वाट न पाहता नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचे तत्काळ पंचनामे करून नुकसानीचा अहवाल सादर करावा, असे आदेश बीडचे जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी यंत्रणेला दिले आहेत. ९८ शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या खरडून आष्टी तालुक्यात झालेल्या जोरदार पावसाचा चार गावांना जास्त तडाखा बसला आहे. ३७.२५ हेक्टर जमीन खरडून गेली आहे. आतापर्यंत बीडमध्ये ७ जनावरे दगावली आहेत. वडवणीमध्ये १ मृत, माजलगावात १ तर अंबाजोगाई पावसामुळे दोघांचा मृत्यू झाला आहे. केजमध्ये ३० हेक्टर, धारूर २० तर आष्टीत १३१.५० हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. २१९ शेतकऱ्यांना याचा फटका बसला आहे.



### बीडच्या शिक्षण विभागांमधील कोट्यावधी रुपयांच्या घोटाळ्याप्रकरणी शिक्षणमंत्र्यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष?

# नाना नावाचा व्यक्ती गंमतीने नांगर ओढू लागला आणि शिक्षण विभागातून पाकीट घेऊन जाऊ लागला?

## माहिती अधिकाराचा प्राथमिकचे वेतन अधीक्षक ढाकणे व माध्यमिकचे वेतन अधीक्षक खटावकर यांनी केला मर्डर?

■ माहिती मागवली एक अन् पाठवली दुसरी; तक्रारदारांची केली फसवणूक?

■ याप्रकरणी दोन्ही वेतनाधीक्षकांवर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल करावा?

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील शिक्षण विभागातील ५०० कोटींचा घोटाळा ओळखीचा आला आहे. तसेच जिल्ह्यातील वेतन अधीक्षक प्राथमिक विभाग ढाकणे व वेतनाधीक्षक माध्यमिक विभाग खटावकर यांना माहिती अधिकारांमध्ये बीड जिल्ह्यातील किती शिक्षकांना आपल्या कार्यालयाकडून थकीत वेतन वितरित करण्यात आले. व आपल्याकडे शाळेने ज्या शिक्षकांची थकीत वेतन बाबतचे आपल्या कार्याकडे दाखल केली. आपण थकीत वेतन वितरित केले त्याच्या आदेशाची व शिक्षकांची व शाळेची यादीची सत्यप्रती ची माहिती मागितली होती. परंतु त्यांनी पोस्टाने सदरची माहिती मिळेल या शाळा धारूर यांच्या मुख्याध्यापकाकडून घ्यावी अशी माहिती पाठवण्यात आली म्हणजेच यांनी सुशिक्षित व माहिती अधिकार आजचा अनुभव असणारे


पान २ वर

### ...तो नाना एका पेपरच्या संपादकाचा खबऱ्या आहे?

संपादक म्हणून अधिकाऱ्यांची दिशाभूल करत आहे. तो जिल्हा परिषद मध्ये दररोज येतो म्हणजे तो का जिल्हा परिषद कर्मचारी आहे का? तो कार्यालयामध्ये येऊन साहेबासारखा खुर्चीवर बसतो. त्याची चौकशी करून त्याच्यावर तात्काळ आवर घालावे, असे अनेकजण अधिकाऱ्यांची दिशाभूल करून स्वतःचा आर्थिक फायदा करण्यासाठी शिक्षण विभाग व इतर कार्यालयामध्ये वावरताना दिसत आहेत. स्वयघोषित पत्रकार त्या नानाचे बीड जिल्हा परिषद मध्ये दररोज काय काम असते. व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड व शिक्षणाधिकारी प्राथमिक यांना तक्रारदार विषय खोटे सांगणे, तक्रारदार हे पैशासाठी तक्रार देतात प्रकरणांमध्ये कोणते तथ्य नाही असे सांगणारे व ज्याची खाजगी शिक्षण संस्थेमध्ये पद भरती करण्यात आली असे, संपादकाचे रिपोर्टर त्या नानाला जिल्हा परिषद मध्ये येण्यास बंदी घालावी, कारण की त्याची दुकानदारी हे जिल्हा परिषद मधूनच चालते. तो यापूर्वी कंत्राटी कर्मचारी म्हणून त्याच कार्यालयामध्ये कार्यरत होता. व आता निवृत्त झाला आहे. सध्या त्याचे काम हे भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाऱ्याला खतपाणी घालने आहे. या नानाचे काम आहे व शिक्षणाधिकारी व काही अधिकाऱ्याची गोड बोलून चिरीमिरी करून स्वतःचा फायदा करून घेण्याचं काम या नानाचा आहे. तो नाना लवकरच सर्वांच्या समोर येणार आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब असल्या नाना पासून सावध राहा व असल्या नानाचा काही ऐकू नका, आपण उच्च पदावर असणारे अधिकारी आहात असे कान भरणाऱ्या चा ऐकू नये, आणि याच्या वर तात्काळ कारवाई करा.

### शालार्थ आयडी देणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या रॅकेटचा पर्दाफाश लवकरच होणार?

शिक्षण उपसंचालक औरंगाबाद या कार्यालयाकडून ज्या शिक्षण उपसंचालकांनी शालार्थ आयडी दिले ते शालार्थ आयडी देताना २०१२ पूर्वी काही शिक्षकांना बनावट कायम मान्यता कागदपत्रे दाखल करून व तत्कालीन शिक्षण अधिकाऱ्यांच्या बनावट स्वाक्षऱ्या करून कायम मान्यता २०१२ पूर्वी देण्यात आल्यानंतर शालार्थ आयडी हे बारा वर्षानंतर का घेण्यात आले. शालार्थ आयडी हे पूर्वी संचालक पुणे यांच्याकडून घेत होते. त्यावेळेस या बोगस शिक्षकांनी शालार्थ आयडी का घेतले नाही. कारण की हे सर्व बोगस होते. व त्यावेळेस त्यांनी हे कागदपत्र बोगस बनवले नव्हते. ते आत्ता मागील काळामध्ये यांनी हे सर्व कागदपत्रे बोगस बनवून शालार्थ आयडी मिळवला व पगार सुरू केली. व थक्कीत वेतन मिळवले या सर्व प्रकरणांमध्ये असणारे सर्व अधिकारी शिक्षण उपसंचालक औरंगाबाद या कार्यालयातील कर्मचारी संबंधित बोगस शिक्षक व संस्थाचालक तसेच शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक यांनी बोगस शिक्षकांचे शालार्थ आयडीचे प्रस्ताव वरिष्ठ कार्यालय पाठवले. तसेच वेतन अधीक्षक प्राथमिक विभाग व माध्यमिक विभाग कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी शिक्षण प्राथमिक विभाग येथील व अधीक्षक रंगनाथ राऊत, क्लर्क भेंडेकर शिक्षण माध्यमिक विभागातील उपशिक्षणाधिकारी मोहन काकडे, क्लर्क शिंदे हे सर्वजण या खाजगी शिक्षक भरती घोटाळा व शालार्थ आयडी घोटाळ्यामध्ये लवकरच अडकणार आहेत व याच्यावरती गुन्हे दाखल करून निलंबनाची कारवाई करण्यात यावी अशी, मागणी इंजिनिअर सादिक इनामदार मराठवाडा अध्यक्ष भ्रष्टाचार निर्मूलन समिती यांनी केली आहे.



# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कमानसाठी आमरण उपोषणास बसलेल्या आंदोलनकर्त्यांना पाठिंबा

## भिमशक्ती, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात) आणि लोकजनशक्ती पार्टी (र) यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



अंबाजोगाई । प्रतिनिधी

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कमान (प्रवेशद्वार) साठी मौजे दौनापूर (ता.परळी, जि.बीड) येथील आमरण उपोषणास बसलेल्या आंदोलनकर्त्यांची प्रकृती खालावली आहे. मागील ४ दिवसांपासून बीड येथे आमरण उपोषण सुरू आहे. तरी याप्रकरणी सदरील आमरण उपोषण तात्काळ सोडवून या प्रकरणातील दोषींवर कारवाई करावी या मागणीचे निवेदन भिमशक्ती, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात) आणि लोकजनशक्ती पार्टी (र) यांच्या वतीने शनिवारी जिल्हाधिकारी, बीड यांना देण्यात आले. तसेच तीनही पक्ष व संघटनांकडून आंदोलनकर्त्यांना जाहीर पाठिंबा दर्शविण्यात आला आहे.

याबाबत भिमशक्तीचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष भिमराव सरवदे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) पक्षाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष अक्षय युवराज भुंबे आणि लोकजनशक्ती पार्टी (र) चे मराठवाडा प्रदेशाध्यक्ष राजेश वाहुळे यांनी २० मे २०२५ पासून जिल्हाधिकारी कार्यालय, बीड समोर आमरण उपोषणास बसलेल्या आंदोलनकर्त्यांची भेट घेऊन त्यांच्या मागणीला व आंदोलनाला जाहीर पाठिंबा दर्शविला. मागील ४ दिवसांपासून हे आमरण उपोषण सुरू आहे. आमरण उपोषणास बसलेल्या आंदोलनकर्त्यांची प्रकृती आता खालावली आहे. या आंदोलनकर्त्यांशी चर्चा करून भिमशक्ती, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात), आणि लोकजनशक्ती पार्टी (र) यांच्या वतीने शनिवारी जिल्हाधिकाऱ्यांना वेगवेगळे ३ स्वतंत्र निवेदन देण्यात आले. सदरील तीन ही निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नांवाने कमान (प्रवेशद्वार) उभारण्यासाठी मौजे दौनापूर ता.परळी वै.येथील समस्त बौध्द समाजाने ग्रामपंचायत कार्यालयास रितसर परवानगी मागितली होती. सरपंच व इतर ग्रामपंचायत सदस्यांनी ज्या ठिकाणी कमान उभारण्यात येणार आहे. त्या जागा मालकांबरोबर संगनमत करून ग्रामपंचायतचा ठराव घेऊन कमान उभारणीस लेखी विरोध केला आहे. समस्त बौद्ध समाज, दौनापूर यांनी गटविकास अधिकारी परळी वै. तसेच तहसिलदार, उपजिल्हाधिकारी, परळी वै. यांना लेखी निवेदनाद्वारे मागणी कळविले होते. परंतु, राजकिय दबावापोटी कसलीही कार्यवाही झाली नसल्यामुळे मंगळवार, दि. २० मे २०२५ पासून जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे सरपंच तसेच कमान उभारणीस जातीयवादी भावनेतून विरोध करणाऱ्या आरोपींविरूद्ध ऑट्रासिटी ऍक्टनुसार गुन्हे दाखल करण्याच्या मागणी करता आज ४ दिवस झाले आमरण उपोषणास बसले आहेत. तरी आपण स्वत: या प्रकरणात लक्ष देऊन दोषींवर कारवाई करावी व सदरिल आमरण उपोषण तात्काळ सोडवावे अन्यथा शनिवार, दि. २४ मे २०२५ रोजी पासून भिमशक्ती, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात) आणि लोकजनशक्ती पार्टी (र) यांच्या वतीने संपूर्ण बीड जिल्हाभरात तीव्र आंदोलन करण्यात येईल याची नोंद घ्यावी, असा इशारा तीनही निवेदनातून देण्यात आला आहे.

निवेदनाची प्रतिलिपी पोलिस अधीक्षक, बीड यांना ही माहितीस्तव देण्यात आली आहे. तर सदरील निवेदनावर भिमशक्तीचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष भिमराव सरवदे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) पक्षाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष अक्षय युवराज भुंबे आणि लोकजनशक्ती पार्टी (र) चे मराठवाडा प्रदेशाध्यक्ष राजेश वाहुळे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. तर यावेळी भीमशक्तीचे बीड जिल्हाध्यक्ष अमरेंद्र विद्यागर, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष सुमित आवाडे, लोक जनशक्ती पार्टीचे परळी तालुकाध्यक्ष विशाल शेवाळे हे उपस्थित होते.



# मालवाहतुक ट्रकखाली चिरडून महिला मृत्यूमुखी

## बीड अहिल्यानगर रोडवर आष्टी शहरात घडली घटना

आष्टी । प्रतिनिधी

मालवाहतूक ट्रकने दुचाकीवरून पती व पत्नी जात असलेल्या गाडीवरील महिला ट्रकच्या चाकाखाली चिरडून जागीच ठार झाल्याची दुर्दैवी घटना रविवारी सकाळी बीड अहिल्यानगर रोडवर आष्टी शहरात सावळेश्वर ट्रॅक्टर्स समोर घडली घटना इतकी दुर्देवी होती की अपघातात २० फुट महिलेला ट्रकने फरफटत नेले.

रविवार सकाळच्या १० च्या सुमारास अहिल्यानगरच्या दिशेने दुचाकी एम एच २० बी.डी.५७०१ वरुन पती व पत्नी जात असताना आष्टी शहरातील सावळेश्वर ट्रॅक्टर्स समोर करिष्मा आयास सय्यद ( वय २४ वर्षे) या शेजारी जाणाऱ्या मालवाहतूक ट्रक (के.ए.३९ ६५७०) या ट्रकच्या चाकाखाली सापडून जागीच ठार झाल्या. दुचाकीस्वार आयास सय्यद (३० वर्ष, करिमनगर रा.मुर्शदपुर, आष्टी) हे गंभीर जखमी झाले. अपघातानंतर ट्रक चालक पोलिसांच्या ताब्यात असून अपघाताची माहिती आष्टी पोलिसांना कळताच पोलिस निरीक्षक शरद भुतेकर, अशोक तांबे, बब्रुवान वाणी, सतिश मुंडे, गणेश राऊत, गणेश गिते यांनी तात्काळ धाव घेत अपघातात जखमी यांना उपचारासाठी आष्टी ग्रामीण रुग्णालयात हलविले. अपघातात ठार झालेल्या महिलेचा मृतदेह रुग्णालयात नेला. पोलिसांनी रस्त्यावरील वाहतूक सुरळीत केली. शवविच्छेदन करुन मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला असून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया आष्टी पोलिस ठाण्यात सुरू आहे.

# दिपक काळकुटे यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी निवड



केज । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई अंतर्गत बीड जिल्हा ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी दैनिक सूर्योदयचे उपसंपादक दीपक काळकुटे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. त्यांच्याकडे शिरूर कासार, आष्टी, पाटोदा आणि गेवराई या तालुक्यांची जबाबदारी देण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संघटक संजय भोकरे साहेब,प्रदेशाध्यक्ष गोविंदजी वाकडे सर,प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे साहेब यांच्या आदेशावरून प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली बीड येथील शासकीय विश्रामगृह बीड याठिकाणी शनिवार २४ मे रोजी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईची महत्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकी मध्ये पत्रकार संघाचे छत्रपती संभाजीनगर येथे होत असलेल्या १५ जून रोजीच्या विभागीय अधिवेशना संदर्भात सविस्तर चर्चा झाली. तसेच पत्रकार संघाचा बीड जिल्हास्तरीय मेळावा दि.५ सप्टेंबर रोजी घेण्याचे निश्चित झाले. यासह विविध विषयावर चर्चा करण्यात आली. यावेळी सर्वांच्या उपस्थितीत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी दिपक काळकुटे यांची निवड करण्यात आली. निवड होताच सर्वांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. तसेच दैनिक सूर्योदय कार्यालय बीड या ठिकाणी सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी सर, दैनिक सूर्योदयचे मुख्य संपादक गंगाधर (नाना) काळकुटे, बीड जिल्हाध्यक्ष अमजद खान, जिल्हा सचिव शेख वसीम, महिला जिल्हाध्यक्षा शेख आयेशा, बीड जिल्हाध्यक्ष अड.विनायक जाधव, महिला सचिव मोरे अनुप्रिता, पत्रकार संघाचे गेवराई तालुकाध्यक्ष अंकुश आतकरे, संघाच्या डिजिटल मिडियाचे जिल्हाध्यक्ष अनिल आगुंडे, केज तालुकाध्यक्ष चंद्रकांत पाटील, वडवणी डिजिटल मीडियाचे तालुकाध्यक्ष सतिष मुजमुले, पत्रकार विष्णू राठोड, सरपंच भास्कर हातागळे, व्यवस्थापक प्रवीण वडमारे, शंकर झाडे, शेख एजाज, सोमेश्वर सोनटक्के, एस.एम. पुसरेकर, अंकुश गवळी यांच्यासह पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुक्ता आर्दड यांना 'शिक्षण रत्न पुरस्कार' प्रदान




बीड । प्रतिनिधी

एकता सेवाभावी संस्था, महाराष्ट्र यांच्या वतीने शैक्षणिक क्षेत्रातून शैक्षणिक कार्याच्या गौरवार्थ दिला जाणारा राष्ट्रीय शिक्षण रत्न पुरस्कार राज्याचे सहकार मंत्री ना.बाबासाहेब पाटील, शिक्षक आ. विक्रम काळे, मा.आ.रामरावजी वडकुते, प्रसिद्ध अभिनेत्री पवित्र रिश्ता फेम उषा नाडकर्णी, फिल्म अभिनेता अली खान एकता सेवाभावी संस्थेचे महाराष्ट्र अध्यक्ष अझहर खान या मान्यवरांच्या हस्ते महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या मराठवाडा महिला सचिव तथा श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालयाच्या शिक्षिका सौ. मुक्ता दिगंबर आर्दड (मोटे) मॅडम यांना देऊन सन्मानित करण्यात आले. सदरील शिक्षक रत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल सौ मुक्ता आर्दड (मोटे) मॅडम यांच्यावर सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

मुंबई येथील एकता सेवाभावी संस्थेच्या वतीने दरवर्षी समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींचा पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला जातो. यावर्षी शैक्षणिक क्षेत्रातून दिला जाणाऱ्या राष्ट्रीय शिक्षण रत्न पुरस्कारासाठी महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या मराठवाडा महिला सचिव तथा राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या गेवराई तालुकाध्यक्षा तसेच श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालयाच्या शिक्षिका सौ. मुक्ता दिगंबर आर्दड (मोटे) मॅडम यांनी शैक्षणिक सामाजिक क्षेत्रातील केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल व शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्न सोडविण्यासाठी दिलेला लढा आता पर्यंत केलेले विविध आंदोलन, गोरगरीब विद्यार्थ्यांना केलेली मदत या सर्व बाबींची दखल घेऊन जाहीर करण्यात आला होता. दरम्यान सदर पुरस्काराचे वितरण दि.२० मे २०२५ मंगळवार रोजी मुंबई मराठी पत्रकार भवन आझाद मैदान महानगरपालिका मार्ग मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या शानदार सोहळ्यात सहकार मंत्री ना.बाबासाहेब पाटील, मराठवाडा शिक्षक आमदार विक्रम बप्पा काळे, मा.आ.रामरावजी वडकुते, एकता सेवाभावी संस्थेचे महाराष्ट्र अध्यक्ष अझहर खान, प्रसिद्ध अभिनेत्री पवित्र रिश्ता फेम उषा नाडकर्णी, फिल्म अभिनेता अली खान या मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी सौ. मुक्ता दिगंबर आर्दड (मोटे) मॅडम यांना सदरील शिक्षक रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

हा पुरस्कार मिळाल्याबद्दल सौ.मुक्ता दिगंबर आर्दड (मोटे) मॅडम यांचे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस व मा.आ. श्री अमरसिंह पंडित, जय भवानी शिक्षण संस्थेचे सचिव जयसिंह पंडित व गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री विजयसिंह पंडित, शारदा क्रिडा अकॅडमीचे संचालक श्री रणवीर काका पंडित व गेवराई तालुक्याचे युवा नेतृत्व श्री पृथ्वीराजे (बाळ दादा) पंडित तसेच उत्तरेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव श्री गोपीनाथ घुले, म.राज्य विनाअनुदानित कृती समितीचे उपाध्यक्ष श्री खंडेराव जगदाळे सर यांच्यासह बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीचे पदाधिकारी, श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, शारदा विद्या मंदिरचे मुख्याध्यापक श्री राजेंद्र जगदाळे, मुख्याध्यापक मुरलीधर पवार सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# ॲड.एकनाथराव आवाड साहेब यांच्या स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन : पांडुरंग कसबे



एकनाथ दगडू आवाड (१९ जानेवारी १९५६ – २५ मे २०१५) हे दलित चळवळीचे नेते आणि मानवी हक्क अभियानाचे राष्ट्रीय अध्यक्ष होते.चळवळीत त्यांना 'जीजा' नावाने ओळखले जायचे. आवाडांचा जन्म १९५० किंवा १९५१ साली बीड जिल्ह्यातल्या वडवणी तालुक्यातील दुकडेगावातील (डुकरेगाव) एका गरीब मातंग समाजात झाला. त्यांचे कुटुंब पोतराज होते. एकनाथांच्या वडिलांचे नाव दगडू तर आईचे भागूबाई होते. शिक्षकांनी शाळेत दाखल करताना १९ जानेवारी १९५६ ही तारीख लिहिल्यामुळे तीच त्यांची अधिकृत जन्मतारीख झाली. घरात खायला दाणा नाही, वडील मागून आणतील त्यावर गुजराण करावी लागे. एकनाथाने पोतराजच व्हावे अशी वडिलांची इच्छा होती, पण आईने कडाडून विरोध केल्याने त्यांना शाळेत जायला मिळाले. शाळेत मागच्या बाकावर बसूनच ते शिकले. आव्हाडांनी घर सोडले, अंगमेहनत करून पैसे मिळवले आणि शिक्षण घेतले. त्यांचे शालेय शिक्षण लऊळ येथे झाले तर महविद्यालयीन शिक्षण बीड आणि अहमदनगर येथे झाले. अहमदनगर येथील कॉलेजातून त्यांनी एलएल.बी. केले. ते एकीकडे एम.एस.डब्ल्यू. झाले आणि दुसरीकडे वकीलही झाले. वडिलांचे केस कापून आवाड यांनी पोतराज प्रथेवर पहिला घाव घातला. घरातूनच संघर्ष सुरू करून त्यांनी पोतराजाच्या प्रथेतून शंभराहून अधिक कुटुंबांची सुटका केली.

शिकत असतानाच एकनाथ आव्हाड विद्यार्थी चळवळीत उतरले,विवेक पंडित यांच्या 'विधायक संसद' नावाच्या युवकांच्या संघटनेत गेले आणि अस्पृश्यता आणि जातिभेद यांविरुद्ध त्यांनी रान पेटवले. त्यांनी १९८० पासून वेठबिगार, पोतराज आदी प्रथांविरुद्ध लढा देणे सुरू केले; भूमिहीन दलितांना गायरान जमिनी ताब्यात घेऊन कसायची हिंमत दिली. त्यासाठी गायरान परिषदा घेतल्या. भूमिहीन महिलांचे त्यांनी बचत गट स्थापले.सावित्रीबाई फुले म्युच्युअल बेनिफिट ट्रस्ट स्थापून महिलांना पतपुरवठा केला. मराठवाड्यातील पाच जिल्ह्यांत या ट्रस्टचे काम चालते. २०१५ सालापर्यंत या ट्रस्टची उलाढाल दहा कोटी रुपयांवर पोचली होती. १९९० साली त्यांनी मानवी हक्क अभियानाला सुरुवात केली. संगम नावाच्या गावात त्यांनी मानवी हक्क अभियान संघटनेची शाखा स्थापन केली. २००१ साली युनोने आयोजित केलेल्या वंशभेदाविरोधातील परिषदेला आव्हाडांनी हजेरी लावली. भारतात अजून जातिभेद नष्ट झाला नाही असे त्यांनी तेथे प्रतिपादन केले. पुढे जिनिव्हा येथील मानवी हक्क संरक्षण संमेलनातही आव्हाडांनी 'जातिप्रथेला हद्दपार करण्याची' त्यांची भूमिका आग्रहाने मांडली. त्यांनी उर्वरित सर्व आयुष्य चळवळीसाठी वाहिले.

'मानवी हक्क अभियान' या चळवळीच्या माध्यमातून आवाड यांनी मराठवाड्यातील सुमारे पन्नास हजार दलितांच्या जमिनी वाचविल्या. त्यांच्या या अभियानामुळे दलितांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्य मिळाले. गुलामीची प्रतीके असलेली गावकीची कामे दलितांनी सोडावीत आणि आत्मसन्मानाने जगावे हा आवाडांच्या चळवळींचा उद्देश होता. त्यासाठी त्यांनी सतत संघर्ष केला. या संघर्षातूनच 'जग बदल घालुनि घाव' हे त्यांचे आत्मकथन जन्माला आले. त्यांचे हे पुस्तक दलित चळवळीसाठी मार्गदर्शक ठरले आहे.

१९१५ साली आवाड यांनी बहुजन समाज पक्षाच्या उमेदवारीवर उस्मानाबाद मतदार संघांतून निवडणूक लढवली होती. यातूनच त्यांचा माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे यांच्याशी संघर्ष वाढला. दलित, वंचित, आदिवासी, शेतमजूर, ऊसतोड कामगार, वेठबिगार, गायरान धारक अशा सर्व घटकातील सामान्यातील सामान्य माणसाला न्याय देण्याचे काम ज्यांनी केलं. शिव, शाहू, बाबासाहेब, अण्णाभाऊ ज्यांच्यामुळे आम्हाला कळाले. अन्यायाविरुद्ध डरकाळी फोडणारे हजारो कार्यकर्ते गावागावात ज्यांनी तयार केले असे कर्मवीर ॲड.एकनाथराव आवाड साहेब यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्रिवान विनम्र कोटी कोटी अभिवादन नमन.

पान १ वरून...

## नाना नावाचा व्यक्ती गंमतीने नांगर ओढू लागला आणि...

इंजिनियर सादिक इमानदार यांची दिशाभूल केली आहे. जिल्ह्यातील किती माहिती अधिकारांमध्ये किती लोकांनी माहिती मागवली असेल व त्यांना सुद्धा अशा प्रकारे चुकीची माहिती पोस्टद्वारे पाठवली असेल यामध्ये सर्वात विचार करण्यासारखी म्हणजे अर्जदार सादिक इमानदार यांनी व्यक्तिश: माहिती मागितली परंतु यांनी पोस्टाने पाठवून त्यामध्ये तक्रारदारांची फसवणूक केली आहे तरी वरील दोन्ही वेतन अधीक्षकावरती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी केली जात आहे.

बीड शिक्षण विभागातील संच मान्यता व संच मान्यता दुरुस्ती करून खाजगी संस्थेमध्ये विद्यार्थी संख्या नसताना व बाहेर राज्यातील विद्यार्थ्यांची बनावट आधार कार्ड दाखवून पद वाढवून आणून बोगस शिक्षक भरती करणारे शिक्षण विभागांमध्ये मोठे रॅकेट असून जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षणाधिकारी भगवान फुलारी, अधीक्षक रंगनाथ राऊत व क्लार्क भेंडेकर व कंत्राटी कर्मचारी अविनाश गजरे यांनी बीड जिल्ह्यातील अनेक खाजगी संस्थांमध्ये २०१९ व २० च्या संचमान्यतेमध्ये पद कमी असताना २०२४–२५ मध्ये बीड जिल्ह्यातील अनेक खाजगी शिक्षण संस्थांमध्ये पद शिक्षण संचालक पुणे या कार्यालयाकडून बेकायदेशीरपत वाढवून आणली. तसेच मिळालेल्या माहितीनुसार बाहेर राज्यातील विद्यार्थ्यांचे आधार कार्ड महाराष्ट्र राज्यामध्ये व बीड जिल्ह्यामध्ये खाजगी शिक्षक संस्था यांच्या संस्थेमध्ये ऑनलाईन नोंदणी करून हे पद भरल्याची माहिती मिळत आहे. हे खूप मोठे भ्रष्टाचार असून या मध्ये वरील सर्वाधिकारी लवकरच जेलची हवा खाणार आहे.

तसेच शालार्थ आयडी घोटाळा प्रकरण बीड शिक्षण विभाग बीड अधीक्षक वेतन कार्यालय बीड ते औरंगाबाद येथील शिक्षण उपसंचालक व अधिकारी यांनी बनावट कागदपत्राच्या आधारे शालार्थ आयडी दिले. याप्रकरणी सुद्धा सखोल चौकाशी होणे गरजेचे आहे. सर्व धागेदोरे लवकर समोर येतील व बनावट कागदपत्रे तयार करून शालार्थ आयडी मिळवणारे शिक्षक व संस्थाचालक व अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. याबाबत बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने हे शिक्षणाधिकारी प्राथमिक भगवान फुलारी यांची सखोल चौकशी करून त्यांच्याकडून माहिती घेण्यासाठी कारवाईचा प्रस्ताव वरिष्ठ अधिकारी कडे पाठवण्यासाठी का घाबरतात. मुख्याधिकारी हे जिल्ह्याचे हेड आहेत. परंतु यांच्याकडूनच याबाबत जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.

# साबला नगरीतील पूर्ण शेतशिवार ए.आर.टी संस्थेने केला पाणीदार : सरपंच जनाबाई काकडे

केज । प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे साबला येथील पूर्ण शेतशिवार पाणीदार करण्याचे काम क्शन रूरल टेक्नॉलॉजी या संस्थेने केला आहे. साबला ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ.जनाबाई काकडे यांच्या विनंतीला मान देऊन ए.आर.टी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.सुहासराव धस जलसंधारण तज्ञ माननीय पवनराव नखाते, प्रकल्प व्यवस्थापक वली तांबेळी, प्रकल्प सहाय्यक श्रीमती ज्योती सांबरे, पोकलेन ऑपरेटर सोनुकुमार चंद्रवंशी, दिलीपकुमार चंद्रवंशी या सर्वांच्या नेतृत्वाखाली मौजे साबला नगरितील नदीच्या पात्राचे खोलीकरण आणि





रुंदीकरण करून पाणी अडवण्यासाठी पाणी जमिनिमध्ये जिरवण्यासाठी कमीत कमी पाच पुट व जास्तीत जास्त सात पुट खोल असे बॉक्स बनवण्यात आले आहेत. त्या बॉक्समध्ये वीस मिटर अंतरावर वीस फूट खोल असे बोरच्या मशिनने बोर घेतले आहेत.

साबला शेतशिवारात पडलेल्या पावसाचे पाणी साबला शेत शिवारातच राहिले पाहिजे. अशा प्रकारचे काम या ए.आर.टी संस्थेने केले आहे. हे केलेले काम चांगल्या प्रकारे कसे राहील याची काळजी ही ए.आर.टी संस्थेच्या सर्व कर्मचारी व सहकारी कमिटीने केले आहे. या गावातील सर्व शेतकरी, शेतमजूर, प्राणी, पक्षी या सर्वांना याचा फायदा कसा होईल याचा विचार करून निर्णय घेतला आहे. तसेच हे सर्व काम व्यवस्थित पणे केले आहे. या कामासाठी सरपंच सौ.जनाबाई नरहरी काकडे यांनीही स्वत: जातीने हजर राहुन लक्ष दिले आहे. काम चांगल्या प्रकारे झाले तर साबला नगरितील सर्व नागरिकांना याचा भविष्यात फायदा होईल याची काळजी त्यांनी स्वत: घेतली आहे. साबला ग्रामपंचायतचे सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य तसेच सर्व गावकरी यांनी ए.आर.टी. संस्था, यवतमाळ या संस्थेचे त्यांनी केलेल्या कामाबद्दल आभार मानले असून राहिलेले काम लवकर पूर्ण करण्यासाठी विनंती केली.

# शेतरस्त्याची नोंद ७/१२ वर होणार : शिवराम राऊत

## शासन निर्णयामुळे शिवश्री कृषि मंडळाच्या मागणीला यश

शिरूर । प्रतिनिधी



शेती करतांनाच्या प्रमुख समस्या पैकि शेतरस्ता नसणे हि गंभीर समस्या मुळे राज्यभरातील शेतकरी त्रस्त असल्याच्या तक्रारी त्यामुधून वाद-विवाद, होऊन शेतकऱ्यांमधील संघर्ष विकोपाला जात असल्याने मह.शासनाने दि.२२ में रोजी महसुल विभागाच्या वतीने शा.नि.क्र-: जमीन २०२५ /प्र.क.४७/ज.१अ नुसार प्रत्येक नेतासाठी बांधावरून किमान ३ ते ४ मिटर रुंदीचा रस्ता अनिवार्य असणार आहे. या संबंधातील मागणी शिवश्री कृषि मंडळ हिवरसिंगा यांच्या वतीने अनेक वर्षापासुन शासन स्तरांवर लावून धरली होती. यामध्ये प्रचलित, वहीवाटीत असणारे पायवाट, गाडीवाट, वस्ती रस्ते सद्यस्थितीत वापरात आहेत परंतू त्याची नोंद महसुली अभिलेख व भूमी अभिलेख मधील गाव नकाशात नोंद नसल्याने शेतकऱ्यांमधील संघर्ष विकोपाला गेल्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत.

या शासन निर्णयामुळे शेतरस्त्याची अडवणूकीतून सामंजस्याने मार्ग काढून अथवा वेळ प्रसंगी महाराष्ट्र जमीन महसुल संहिता १९६६ चे कलम १४३ व मामलेदार कोर्ट १९०६ चे कलम (५) नुसार शेतकऱ्यांचा जमीन कसण्यासाठी शेतरस्ता मिळणे हक्क आसल्याने या प्रमाणे सक्षम प्राधिकृत अधिकारी यांनी या संबंधी तक्रारीची दखल घेऊन तुंबलेल्या शेत रस्ते, अतिक्रमित शेत रस्ते खुले करून अथवा बांधावरून सामंजस्याने किमान ३ ते ४ मिटर रस्ते निर्माण त्यांची नोंद ७/१२ च्या इतर हक्कात करण्याचा शेतकरी हिताचा निर्णय आहे. यामुळे शेतीमधील बियाणे, खते, औजारे तसेच आधुनिक साधने जसे कि ट्रॅक्टर, विविध यंत्र मशिनरी अत्याधुनिक साधनांच्या वापरातील अडथळे दुर होऊन शेतकऱ्यांना वहिवाटीस सुलभता येणार आसल्याने शिवश्री कृषिमंडळाच्या अनेक वर्षांच्या मागणीला काही अंशी यश प्राप्त झाले आहे. यामुळे शिवराम राऊत व पिडीत शेतकरी वर्गाकडून शासनाचे आभार व्यक्त केले जात आहेत.

# मंगळवारी तिरुपती सुपरस्पेशलिटी हॉस्पिटल येथे पोट विकार, मूत्रविकार मोफत तपासणी शिबीर

बीड । प्रतिनिधी

बीड शहरात नव्याने सुरू झालेल्या सुप्रसिद्ध मनका विकार तज्ञ डॉ बालाजी नवले यांच्या तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल नगर नाका बीड येथे बीड जिल्ह्यातील पोट विकार आणि मूत्रविकार रुग्णांसाठी छत्रपती संभाजीनगर येथील सुप्रसिद्ध लेप्रोस्कोपिक सर्जन व पोट विकार तज्ञ डॉ दीपक शिंदे यांचे मंगळवार दि.२७ मे २०२५ रोजी सकाळी दहा ते तीन या वेळेत मोफत पोट विकार मूत्रविकार व पोटासंबंधी इतर विकारावर मोफत तपासणी व मार्गदर्शन शिबिर होणार आहे तरीही गरजू रुग्णांनी या मोफत तपासणी शिबिराचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलच्या वतीने करण्यात आले आहे.




**छत्रपती संभाजी नगर येथील सुप्रसिद्ध लॅप्रोस्कोपीक सर्जन डॉ. दीपक शिंदे देणार सेवा**

यांचे मोफत पोटाच्या विकारासंबंधी तपासणी व मार्गदर्शन शिबिर होणार असून गरजू रुग्णांनी या शिबिराचा अवश्य लाभ घ्यावा. शिबिरामध्ये मूत्ररोग, मुतखडा विकार, हर्निया, पोटाचे कुठलेही विकार, कॅन्सर पित्ताशयाचे आजार, मुळव्याध, फिशर, भगंदर पॉलीट्रेमा, दुर्बिन द्वारे होणारे पोटाचे ऑपरेशन इत्यादी विकाराने त्रस्त असणाऱ्या रुग्णांसाठी हे शिबिर आयोजीत करण्यात आले असून जिल्ह्यातील सर्व गरजू रुग्णांनी या पोट विकार तपासणी शिबिराचा अवश्य लाभ घ्यावा नाव नोंदणी सुरू झाली आहे. ७७७०००३२२९, ८६६८२१२३३१ नंबर वरती संपर्क साधून नाव नोंदणी करून घेण्याची आवाहन करण्यात आले आहे.

# सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाट यांचे बाजीराव चव्हाण यांच्याकडून बीडनगरीत जंगी स्वागत

बीड । प्रतिनिधी





राज्याचे सामाजिक न्याय मंत्री श्री संजयजी शिरसाठ साहेब हे दि २४ वार शनिवार रोजी तिरंगा रॅलीत सहभागी होण्यासाठी आले होते. सीमेपलीकडून वारंवार होणाऱ्या भ्याड हल्ल्यांना भारतीय सैन्याने दिलेले रोकठोक प्रत्युत्तर आणि भारतमातेच्या वीर पुत्रांची शौर्यगाथा आशा अभूतपूर्व शौर्याला सलाम करण्यासाठी आणि मातृभूमीसाठी बलिदान दिलेल्या शहीद जवानांना अभिवादन करण्यासाठी तिरंगा रॅलीत सहभागी होण्यासाठी बीड शहरात आले होते.

रॅलीची सुरवात बीड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण तिथून रॅली सुभाष रोड मार्गे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करून सांगता झाली. तिथून मंत्री. संजयजी सिरसाट, हर्षदाताई सिरसाट हे युवासेनेचे मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांच्या धर्मवीर प्रतिष्ठान कार्यालय तसेच शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष बीड या कार्यालयास भेट देण्यासाठी आले होते. यावेळी युवा सेनेचे मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांनी त्यांच्या हजारो युवासेना पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजयजी शिरसाट यांचे क्रेन आणि जेसीबी मार्फत पुष्पवृष्टी करून जंगी स्वागत केले. यावेळी कार्यक्रम प्रसंगी युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांनी मराठवाड्यात उभा केलेली हजारो युवा सैनिकांची फौज दिसून आली.

यावेळी उपस्थित बीड जिल्हा शिवसेना युवासेना मराठवाडा निरीक्षक आरोग्यदूत बाजीराव (दादा) चव्हाण तसेच बीड जिल्हा शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मूळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर, युवा सेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव, युवा नेते सुरज चुंगडे, युवासेना जिल्हाप्रमुख सुमित कोळपे, युवासेना जिल्हाप्रमुख अजय सुरवसे, तसेच सर्व शिवसेना पदाधिकारी, शिवसैनिक, युवासैनिक हजारोच्या संख्येने उपस्थित होते.



# मांजरा विकास प्रतिष्ठानातर्फे नायगांव येथे रक्तदान शिबिर संपन्न, २९ रक्तदात्यांनी केले रक्तदान

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील मोजे नायगाव येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती संभाजी महाराज, महात्मा बसवेश्वर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त मांजरा विकास प्रतिष्ठानाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

स्वामी रामानंद तीर्थ शासकीय रुग्णालय अंबाजोगाई यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात २९ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यामध्ये तरुणांनी विशेष सहभाग नोंदवला होता. शिबिराचे उदघाटन मांजरा विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण खोडसे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मांजरा विकास प्रतिष्ठानचे संचालक गावातील नागरिक तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते. रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी संस्थेचे पदाधिकारी आणि सर्वसदस्यांनी विशेष मेहनत घेऊन हा कार्यक्रम यशस्वी केला.



बीड च्या आरटीओ अश्विनी ताई मोरे आरबे यांच्या गृहप्रवेशाच्या कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. यावेळी मिलिंद भाऊ मुजमुले, प्रकाश थोरात, पत्रकार सुनिल थोरात, पत्रकार आकाश लोखंडे, सागर थोरात यांची उपस्थिती होती.

# आवास योजनेअंतर्गत ८५ लाभार्थ्यांना घरकुल मंजुरी प्रमाणपत्र वाटप



केज । प्रतिनिधी

केज नगरपंचायत येथे रमाई आवास योजना व पंतप्रधान आवास योजना अंतर्गत ८५ लाभार्थ्यांना घरकुल मंजुरी प्रमाणपत्र व हप्ते वाटप करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार, केज नगर पंचायतच्या नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड, गटनेते राजूभाई इनामदार, नगरसेवक जलालभाई इनामदार, गटनेते भाऊसाहेब गुंड, नगरसेविका पद्मिनी अक्का शिंदे, किसन दादा कदम, एम.डी.घुले सर, लखन हजारे, बबलू भैय्या साखरे, इंजि. ज्योतिबा घाडगे, भीमराव मस्के इत्यादी मान्यवर यावेळी उपस्थित होते.




बीड जिल्ह्यातील भारतीय कराटे संघ आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी काठमांडू नेपाळ येथे रवाना. उजवीकडून केज येथील कराटे प्रशिक्षक अनिल ठोंबरे सर, त्यांचे सहकारी व विद्यार्थी.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती गेवराई तालुकाध्यक्षपदी तुळशीराम वाघमारे



तलवाडा । प्रतिनिधी

बीड येथील शासकीय विश्रामगृह याठिकाणी शनिवार २३ मे रोजी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ (मुंबई) ची महत्वपूर्ण बैठक राज्याचे प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीमध्ये पत्रकार संघाचे छत्रपती संभाजीनगर येथे होत असलेल्या अधिवेशन संदर्भात सविस्तर चर्चा झाली तसेच पत्रकारांच्या विविध विषयावर चर्चा करण्यात आली. यावेळी सर्वांच्या उपस्थितीत पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीच्या गेवराई तालुकाध्यक्षपदी तुळशीराम वाघमारे यांची निवड करण्यात आली.

निवड होताच सर्वांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले तसेच दैनिक सूर्योदय कार्यालय बीड याठिकाणी सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी सर, दैनिक सूर्योदय चे मुख्य संपादक गंगाधर (नाना) काळकुटे, कार्यकारी संपादक दीपक काळकुटे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे गेवराई तालुकाध्यक्ष अंकुश आतकरे, डिजिटल मिडिया जिल्हाध्यक्ष अनिल आगुंडे, पत्रकार विष्णू राठोड, सरपंच भास्कर हातागळे, व्यवस्थापक प्रवीण वढमारे, बीड जिल्हाध्यक्ष विनायक जाधव, बीड शहर जिल्हाध्यक्ष अमजद खान, महिला जिल्हाध्यक्षा शेख आयशा, मोरे अनुप्रिता, सतिष मुझमुले, शेख वशिम, शंकर झाडे, शेख एजाज, सोमेश्वर सोनटक्के, एस.एम. पुसरेकर, चंद्रकांत पाटील, अंकुश गवळी यांच्यासह पत्रकार बांधव उपस्थित होते.

# केजचे भूमिपुत्र प्रा.शशिकांत पवार व प्रा.वैशाली यादव यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

केज । प्रतिनिधी

शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी बद्दल महाराष्ट्र राज्य हिंदी अध्यापक संघा तर्फे दिला जाणारा पुणे जिल्हा हिंदी आदर्शशिक्षक पुरस्कार केज तालुक्यातील सावळेश्वर (पै.) चे भूमिपुत्र प्रा.शशिकांत पवार वसुंधरा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पैठण (सा.) ता .केज, जि बीड. यांना नाशिक पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजित तांबे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.याप्रसंगी त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष साहेबराव घाडगे पाटील, महाराष्ट्र राज्य हिंदी अध्यापक संघाचे अध्यक्ष मिलिंद कांबळे, सचिव रेवणनाथ कर्डिले,पुणे विभागाच्या अध्यक्ष डॉ.नेहा बोरसे आदी उपस्थित होते. अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा येथील त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान येथे महाराष्ट्र राज्य हिंदी अध्यापक संघाची दोन दिवसांची कार्यशाळा संपन्न झाली. प्रा.शशिकांत पवार हे केज तालुक्यातील सावळेश्वरचे (पै.) चे भूमिपुत्र आहेत. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत प्रा.शशिकांत पवार यांनी आपले शिक्षण पूर्ण केले आणि मोठ्या जिद्दीने ते शिक्षक झाले.




सध्या ते केज तालुक्यातील वसुंधरा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पैठण (सा.) या ठिकाणी हिंदी विषयाचे अध्यापन करत आहेत. त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत महाराष्ट्र राज्य हिंदी अध्यापक संघाकडून त्यांना आदर्शशिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. त्याबद्दल त्यांचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे, कै.भुजंगराव सेवा प्रतिष्ठाण सारणी (आ)अध्यक्ष सौ.सारिकाताई बजरंग सोनवणे, सचिव ॲड.गोपाळराव कांदे, प्रा.शिवाजी मांदळे, संतोष रोकडे, भागवत गोरे, प्राचार्य सुशिलकुमार गायकवाड, कुलकर्णी पी.आर, बारसागडे एम.एस,डाके डी.आर, साखरे ए.एम, शिनगारे ए.डी, चौधरी ए.एन, तोडकर यु.एम., गायकवाड एन.एम., चौधरी एच.के, सरवदे ए.व्ही, लोकरे डी.ए, वटाणे के.एस, बिक्कड ए.आर, शिनगारे मनोज कल्याणराव, सोनवणे एस.एम, मस्के के.जी, चौधरी यु.एम, गायकवाड ए.पी यांनी अभिनंदन केले आहे. आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित झाल्यामुळे ते खूप आनंदित आहे. मागच्या अनेक वर्षांपासून हिंदी विषयाचे अध्यापन ते प्रामाणिकपणे करीत आहे.हा पुरस्कार त्यांनी त्यांच्या आई कै.लक्ष्मीबाई बाळासाहेब पवार यांना समर्पित केला.

तसेच दुसरा हिंदी आदर्श शिक्षक पुरस्कार केज तालुक्यातील बनसारोळा येथील आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील हिंदी विषयाच्या शिक्षिका प्रा.वैशाली यादव यांना नाशिक पदवीधर मतदार संघाचे आमदार सत्यजित तांबे यांच्याच हस्ते प्रदान करण्यात आला. त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत महाराष्ट्र राज्य हिंदी अध्यापक संघाकडून त्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. अनेक वर्षांपासून हिंदी विषयाचे अध्यापन करत असलेल्या प्रा.यादव मॅडम या विद्यार्थी प्रिय शिक्षिका आहेत. त्यांच्या विषयात यावर्षी शंभर पैकी शंभर गुण घेऊन विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्याचा नावलौकिक केला आहे. आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्या बद्दल प्रा.वैशाली यादव यांचे ग्रामविकास शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव बालासाहेब काकडे, अध्यक्ष अशोकराव काकडे, कोषाध्यक्ष मुरलीधरराव काकडे, सर्व संचालक, मुख्याध्यापिका सिंधुताई चव्हाण व सर्व सहकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे. आदर्श शिक्षिका पुरस्कार मिळाल्याबद्दल मनस्वी आनंद होत आहे. त्याचबरोबर आणखी चांगले काम करण्याची जबाबदारी सुद्धा वाढली आहे.

# रेल्वे कामाच्या नावाखाली रस्त्याचे वाजले तीनतेरा

## अवजड वाहन गेल्याने स्वखर्चाने बनवलेला रास्ता झाला चिकलमय

वडवणी । प्रतिनिधी
वडवणी तालुक्यातील उपळी ग्रामपंचायत हद्दीमध्ये येत असलेल्या सावंत वस्ती वरील रस्त्याचे रेल्वेच्या कामामुळे तीनतेरा वाजले आहे. गत वर्षी प्रत्येक लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्त्याला या रस्त्याबाबतीत सांगितले असता येथे कसल्याही प्रकारची कोणी दखल घेतली नाही.

ब्राह्मणाथ तांडा ते सावंत वस्ती येथील रस्त्याची अत्यंत वाईट अवस्था असतांना गत वर्षी प्रत्येक लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्त्याला या रस्त्याबाबतीत संघीतल असता येथे कसल्याही प्रकारची कोणी दखल घेतली नाही. त्यामुळे येथील लोकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत होते. त्याच वेळी एक रुग्ण रुग्णालयात उपचारासाठी घेऊन जाण्यासाठी कसल्याच प्रकारचा वाहन जात नसल्याने येथील लोकांना घरातील चारपाई (बाजावर) रुग्णाला घेऊन ब्राह्मणाथ तांडा येथेन रुग्णाला रुग्णालयात हलविण्यात आले होते.
त्यानंतरही वेळोवेळी लोकप्रतिनिधीला येथील परिस्थिती दाखवूनही काही दखल न घेतल्याने व रस्ता तात्काळ बनवण्याची गरज असल्याने येथील रहिवासी असलेल्या लोकांनी स्वखर्चाने निधी जमा करून येथील रस्ता दुरुस्त करून घेतला होता. परंतु सध्या रेल्वेचे कामे चालू असून रेल्वेचा १४ नंबरचा पूल बनवण्याचे कामे चालू आहे म्हणून त्या कामाला लागणारे साहित्य नेण्यासाठी अवजड वाहनाचा उपयोग होत असल्याने व सतत पाऊस पडत असल्याने येथील स्वखर्चाने बनवलेला रास्ता हा अत्यंत खराब झाला असून येथील शेतकरी व रहदारी करणाऱ्या नागरिकांना रेल्वेच्या कामामुळे पुन्हा तेच दिवस बघण्याची वेळ आली आहे. त्यामुळे येथील नागरिकांमध्ये संताप निर्माण होत असून या भागातील खासदार व आमदार या लोकप्रतिनिधीनी काही अनर्थ घडण्यापूर्वी याकळे तत्काळ लक्ष देऊन हा रस्ता दुरुस्त करून घ्यावा, अशी मागणी येथील नागरिकांनी केली आहे.

हा रस्ता बीड परळी मार्गाला जोडणारा मुख्य रस्ता असून आमच्या वस्तीवरील महिलांना प्रसूतीसाठी, रुग्णांना उपचारासाठी व शेतकऱ्यांच्या शेतामध्ये खत, बी बियाणे व सर्व शेतीला लागणारी साहित्य नेण्यासाठी एकमेव रास्ता असल्याने सर्व शेतकरी व नागरिकांनी स्वखर्चाने हा रस्ता बनवला होता. परंतु रेल्वेच्या कामासाठी भरपावसात अवजड वाहन गेल्यामुळे हा रस्ता पुन्हा चिकलमय झालं असून येथील शेतकऱ्यांना व रहिवाश्यांना रहदारीसाठी रस्ताच नाही त्यामुळे लोकप्रतिनिधी यांनी तात्काळ लक्ष द्यावे. यापूर्वी स्वखर्चाने आम्ही रास्ता केला होता. परंतु येथील लोकांची गरीब परिस्थिती असून रेल्वेच्या गुत्तेदारांनाही लक्ष देऊन हा रस्ता करून घ्यावा.
– विनायक शेळके,
उपसरपंच उपळी ग्रामपंचायत





बीड : नवी भाजी मंडई येथील लाईट चे पोल तुटून दुकानावर टेकलेले आहे, त्याला तात्पुरते दोरीने आणि तारीने बांधलेले आहे. त्यावर लाईट चे तार नाही, परंतु महावितरण विभागाने पोल काढून न्यावे अशी मागणी होत आहे.

# ना. पंकजाताई मुंडे यांनी पुण्यात कसपटे कुटुंबियांची घेतली भेट; परिवाराचे सांत्वन करत दिला धीर

## वैष्णवीच्या जगण्याचा हक्क हिरावून घेणाऱ्यांना कडक शिक्षा होईल



पुणे । प्रतिनिधी
वैष्णवी हगवणे वर मोठा अन्याय झाला आहे, ज्यांनी कुणी तिच्या जगण्याचा हक्क हिरावून घेतला आहे. त्यांना कडक शिक्षा होईल असं राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी येथे सांगितलं. ना. पंकजाताई मुंडे यांनी आज पुण्यात वैष्णवीच्या माहेरी जावून तिचे वडिल अनिल कसपटे व कुटुंबियांची भेट घेतली, त्यांचे सांत्वन केले तसेच त्यांना धीर दिला, त्यानंतर माध्यमांशी प्रतिक्रिया देताना त्या बोलत होत्या.
यासंदर्भात बोलताना ना. पंकजाताई म्हणाल्या, वैष्णवीच्या परिवाराला आज भेटले, त्यांचं म्हणण ऐकून घेतलं, त्यांच्या म्हणण्यानुसार वैष्णवी वर ज्या प्रकारे अन्याय झाला आणि तिचे प्राण गेले ते ऐकून महाराष्ट्रातील सर्व सामान्य माणूस देखील सुन्न झाला. प्रत्येक आई वडील आपल्या मुलीला लाडाने वाढवितात, तिच्या विवाहासाठी सर्वस्व पणाला लावतात, तिच्या सुखासाठी प्रयत्न करतात, पण अशा पध्दतीने मुलीचा प्राण गेला तर त्यांच्यासमोर मोठं प्रश्नचिन्ह उभं रहात. कसपटे कुटुंबाने तिच्या सुखासाठी सर्व केलं तरी देखील वैष्णवी चे प्राण गेले.
ही घटना खरोखरच वेदना देणारी आहे. मी वैष्णवीच्या परिवाराच्या पाठिशी आहे. राज्याची एक मंत्री व महिला म्हणून मी त्यांना आश्वस्त केले आहे, त्यांच्या मनात कुठलीही शंका राहणार नाही. मुख्यमंत्री महोदयांशी पण त्यांची चर्चा झाली आहे. परिवाराच्या म्हणण्यानुसार ज्यांनी कुणी तिच्या जगण्याचा हक्क हिरावून घेतला आहे त्यांना कडक शासन झाल्याशिवाय राहणार नाही असं ना. पंकजाताईंनी यावेळी सांगितलं.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकासाठी जागा द्या

**मातंग समाजाचे नेते अनिल राधे कांबळे यांची ना. सिरसाट यांचेकडे मागणी**

माजलगाव । प्रतिनिधी
साहित्यशोधक लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकासाठी माजलगावात जागा द्या अशी मागणी ब्रह्मगावचे उपसरपंच तथा मातंग समाजाचे युवा नेते अनिल राधे कांबळे यांनी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्याकडे निवेदनाद्वारे दि.२४ मे रोजी केली आहे.
दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध साहित्यिक, समाजसुधारक आणि लोकशाहीचे कट्टर समर्थक अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने तसेच त्यांच्या साहित्यातून आणि विचारातून अनेक पिढ्यांना प्रेरणा मिळाली आहे. आणि त्यांचे योगदान समाजाच्या प्रबोधनासाठी अतुलनीय आहे. त्यामुळे आपल्या नेतृत्वात अण्णाभाऊ साठे यांचे स्मारक उभारणीसाठी माजलगाव येथे योग्य जागा निश्चित करण्यात यावी आणि आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात यावा. या स्मारकाच्या माध्यमातून नागरीकांना त्यांच्या जीवनकार्याची ओळख होईल व तरूणांना त्यांच्या विचारांपासून प्रेरणा मिळेल.
अशी मागणी करण्यात आली. यावेळी मातंग समाजाचे युवा नेते अनिल राधे कांबळे, मनोज वाघमारे, ईश्वर येवले, राम घोडके, विकास शेरकर, पप्पू बाबर, आकाश कारके, श्याम कांबळे, विक्रांत कांबळे, संकेत कांबळे, प्रशांत कांबळे, युवराज कांबळे, प्रवीन कांबळे, शरद कांबळे, सागर कांबळे, अविनाश कांबळे, दत्ता कांबळे यांचे सह समाज बांधव वर्ग उपस्थित होता.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्या नराधमावर गुन्हा दाखल



सिरसाळा । प्रतिनिधी
डॉ.बाबासाहेबआंबेडकर व.धर्मनिरपेक्ष विचार करणारे दलित, बौद्ध समाजातील लोकांबद्दल २४ मे २०२५ रोजी आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्या मुंगी (ता.धारूर) युवकांविरुद्ध सिरसाळा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.
याविषयी तक्रार लक्ष्मण नागोराव शिंदे यांनी केलेल्या तक्रारीनुसार सविस्तर वृत्त असे की दि.२४ मे २०२५ रोजी सकाळी १०.०२ वाजण्याच्या सुमारास फेसबुक पोस्टवर मुंगी येथील गावातील इसम नामे भागवत अशोक सलगर यांनी त्याच्या फेसबुक अकाउंट वर जम्मू काश्मीर मे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर की कितने पुतले है. कोई बतायेगा जय भिम जय भिम वाले. सेक्युलर कुत्ते अशी पोस्ट करून विशिष्ट एका सहूमातील व्यक्तींना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व आंबेडकरवादी समुहाविरुद्ध खोटे वृत्तप्रसारित आश्या वारंवार पोस्ट करून चितावणीखोर पोस्ट केली आहे. म्हणून भागवत अशोकराव सलगर रा.मुंगी ता.धारूर जि.बीड याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून आला असून पुढील तपास सिरसाळा पोलीस हे करीत आहेत.

# माजलगाव शहरात घाणेचे साम्राज्य, नगरपरिषदेचा कारभार भगवान भरोसे

## ओपन स्पेसांची विक्री, बोगस सिमेंट रस्तेतील भ्रष्टाचार, तात्काळ मुख्याधिकारींची बदली करा : शेख रशिद



माजलगाव । प्रतिनिधी
माजलगाव नगरपरिषद वेगवेगळ्या कारणांने गाजत असते ओपन स्पेस (शासकीय आरक्षित जागा) ची विक्री करणारे अधिकारी, कर्मचारींवर झालेले गुन्हे, बोगस सिमेंट रस्तेतील भ्रष्टाचार, नाले, अस्वच्छता, अधिकारी व कर्मचाऱ्यांना अंकुश नसल्यामुळे नगरपरिषद प्रशासनाची मर्यादा उघड पडतं आहे. त्यामुळे नगरपरिषदची प्रतिमा मलिन झाल्यामुळे शहरात उलट सुलट चर्चेला उत येत आहे ह्याला पुर्णपणे जिम्मेदार मुख्याधिकारी असून ह्यांच्या कारभाराविषयी विरोध दर्शविण्यात येत आहे. यामुळे माजलगाव नगरपरिषद चे मुख्याधिकारी यांची तात्काळ बदली करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ता शेख रशिद यांनी केली आहे.
माजलगाव शहरात घाणीचे साम्राज्य पसरले असुन पावसाने शहरातील मुख्य रस्त्यांवरील नाल्या साफ न केल्यामुळेच नाल्या भरभरून वाहत असल्यामुळे सामान्य नागरिक,व्यापारी वर्ग चिंताग्रस्त झाले आहे तसेच घरातील घाण कचरा उचलण्यासाठी घंटागाडी दररोज सकाळी न येता सात, आठ दिवसाला एकदा येत आहे व प्रत्येक वार्डातील नाल्या पंधरा पंधरा दिवस साफ न केल्यामुळे रोगराई पसरत असुन सामान्य नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे माजलगाव नगरपरिषदेचा वाली कुणी आहे का नाही? असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडतं आहे.
माजलगाव नगरपरिषद मधील कारभार भगवान भरोसे चालु असुन माजलगाव नगरपरिषदचे मुख्याधिकारी यांची तात्काळ बदली करावे व जिल्हाधिकारी साहेबांनी माजलगाव नगरपरिषद मधील कारभारावर लक्ष देण्याची गरज आहे अशी प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ता शेख रशिद यांनी दिली आहे.




# युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेशजी सरनाईक यांच्या मार्फत बीडच्या चार निष्ठावंत युवासैनिकांना स्कॉर्पिओ गाडी भेट

## बाजीराव चव्हाण यांच्या चार निष्ठावंत युवासेना पदाधिकाऱ्यांना स्कॉर्पिओ गाडीचे गिफ्ट

बीड । प्रतिनिधी
महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, खासदार श्रीकांत शिंदे, युवा सेना कार्याध्यक्ष पूर्वेशजी सरनाईक यांच्या कार्याला प्रेरित होऊन महाराष्ट्रातील युवा मोठ्या प्रमाणात युवा सेनेत दाखल होताना दिसून येत आहेत. युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांच्या मराठवाड्यात वाढत असलेला युवा सेनेचा विस्तार युवकांसाठी आज प्रेरणा देणारा आहे. मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या कार्यप्रणालीला प्रेरित होऊन बीड जिल्हात युवासेनेचा आवाका वाढत चालला आहे. याच कार्यप्रणालीला प्रेरित होऊन बीड मधील युवा सैनिकांनी युवा सेना वाढवण्यासाठी बाजीराव चव्हाण यांच्या खांद्याला खांदा लावून युवासेना वाढववली. आज बाजीराव चव्हाण यांच्या तालमीत वाढलेले मेहनती एकनिष्ठ असलेले चार युवासैनिक यांचे चांगले कार्यपाहून त्यांना युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेशजी सरनाईक यांच्यामार्फत चार स्कॉर्पिओ गाड्या भेट देण्यात आल्या आहेत. गाड्या भेट देताना प्रमुख उपस्थितीत राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजयजी शिरसाट, हर्षदाताई सिरसाट, तसेच युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांच्या उपस्थितीत बीडच्या चार निष्ठावंत कार्यकर्त्यांना स्कॉर्पिओ गाड्या आज भेट देण्यात आल्या आहेत. यावेळी उपस्थित बीड जिल्हा शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मूळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर, युवासेना मराठवाडा निरीक्षक आरोग्यदूत बाजीराव (दादा) चव्हाण तसेच युवा सेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव, युवा नेते सुरज चुंगडे, मा. युवासेना जिल्हाप्रमुख सुमित कोळपे, मा युवासेना जिल्हाप्रमुख अजय सुरवसे, तसेच सर्व शिवसेना पदाधिकारी, शिवसैनिक, युवासैनिक उपस्थित होते.

# बोगस कृषी निविष्ठाबाबत करा तक्रार : साहिल सय्यद

कडा । प्रतिनिधी
जिल्ह्यातील बियाणे, खते व कीटकनाशके यांच्या खरेदी विक्री, गुणवत्ता व पुरवठयाच्या अनुषंगाने येणाऱ्या अडचणींचे तत्काळ निवारण करण्यासाठी खरीप हंगामासाठी १५ मे ते १५ ऑगस्ट या कालावधीत जिल्हास्तरावर 'निविष्ठा उपलब्धता व तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आला आहे, असे कृषी विभागाने कळविले आहे.
सदर नियंत्रण कक्षाशी दररोज सकाळी १० ते सायंकाळी ७ या वेळेत भ्रमणध्वनी क्रमांक ९४०३ ३०८ ६०८ तसेच टोल फ्री क्रमांक १८००२३३४००० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन कृषी विकास अधिकारी साहिल सय्यद यांनी जिल्यातील सर्व नागरिकांना केले आहे.

**जास्त दराने खताची विक्री झाल्यास कारवाई**

पुढील काही दिवसात पेरणीच्या कामांना वेग येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी बियाणे खरेदीस सुरूवात केली आहे. बियाणे व खते यात बोगस कंपन्यांच्या माध्यमातून कोणत्याही प्रकारचे शेतकऱ्याचे नुकसान होऊ नये याची काळजी कृषी विभागामार्फत घेतली जात आहे. युरिया खत ज्यादा दराने विक्री केल्याचे व युरिया सोबत इतर अनावश्यक खते लिंकिंग करीत असल्याचे निदर्शनास आल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा मोहीम अधिकारी सायप्पा गरांडे यांनी दिला आहे.

**तालुक्याशी संपर्क साधा**

खते, बियाणे विक्रीदरम्यान काही गैरव्यवहार होत असल्यास शेतकऱ्यांनी स्थानिक कृषी सहायक किंवा तालुक्यातील कृषी अधिकारी, पंचायत समिती यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



जिल्हास्तरावर १ व तालुकास्तरावर प्रत्येकी १ असे जिल्ह्यात एकूण १२ भरारी पथके स्थापन केली आहेत. त्याचबरोबर दि. १ जून २०२५ पासून कृषी निविष्ठा संबंधित तक्रार निवारण कक्षबाबत माहीती देणारे फलक प्रत्येक निविष्ठा केंद्रामध्ये दर्शनिय भागावर लावण्याबाबत बंधनकारक करण्यात आलेले आहे. जिल्ह्यातील कृषी विभागाचे पथक बारीक लक्ष ठेऊन आहे.
– साहिल सय्यद, (कृषी विकास अधिकारी, जि. प. बीड)

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT